DISTRICT MAGISTRATE OSMANABAD

# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

(उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301

फॅक्स क्रमांक 02472-228018

Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.

3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.

4. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26

दिनांकः- 13/04/2020.

**विषय:- सार्वजनिक ठिकाणी वावरताना नाक व तोंडावर मास्कचा/रुमालाचा वापर पुढील आदेशापर्यंत बंधनकारक करण्याबाबत.**

## आदेश

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी करोना विषाणु (COVID-19) हा संसर्गजन्य आजार आहे व त्याचा प्रादुर्भाव बाधित रुग्णाच्या शिंकेतून, खोकल्यातून बाहेर पडणा-या थेंबांद्वारे होत आहे. करोना विषाणु (COVID-19) चा हा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी वावरताना, शिंकतांना, खोकताना आपल्या नाकावर व तोंडावर मास्क अथवा स्वच्छ रुमाल बांधणे तसेच एकमेकांपासून वैद्यकीय निकषांनुसार निश्चित केलेले पुरेसे सामाजिक अंतर ठेवणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी उस्मानाबाद जिल्ह्यामध्येसुद्धा करोना विषाणु (COVID-19) चा संसर्ग झालेले तीन रुग्ण आढळून आलेले आहेत. तसेच करोना विषाणु (COVID-19) चा संसर्गाबाबत संशयित व्यक्तींना रुग्णालयातील आयसोलेशन वॉर्डमध्ये दाखल करुन, इन्स्टिट्यूशनल/होम क्वारन्टाईन करुन अशा रुग्णांची चाचणी करणे, त्यांचेवर उपचार करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये करोना विषाणु (COVID-19) चा प्रादुर्भाव होवू नये यासाठी नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी वावरताना, शिंकतांना, खोकताना आपल्या नाकावर व तोंडावर मास्क अथवा स्वच्छ रुमाल बांधणे तसेच एकमेकांपासून वैद्यकीय निकषांनुसार निश्चित केलेले पुरेसे सामाजिक अंतर ठेवणे बंधनकारक करणे आवश्यक आहे.



Scanned by CamScanner

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद उपरोक्त वाचा क्र. 2 व 3 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार **उस्मानाबाद जिल्ह्यातील नागरिकांनी पुढील आदेशापर्यंत सार्वजनिक ठिकाणी वावरताना आपल्या नाकावर व तोंडावर मास्क अथवा स्वच्छ रुमाल बांधणे तसेच एकमेकांपासून वैद्यकीय निकषांनुसार निश्चित केलेले पुरेसे सामाजिक अंतर ठेवणे बंधनकारक असल्याचे आदेशित करीत आहे.**

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती, संस्था अथवा संघटना आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 51 तसेच उपरोक्त वाचा क्र. 2 मधील "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" चे नियम 11 नुसार, भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 मधील तरतुदींनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

**(दिपा मुधोळ-मुंडे)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रत:-** 1. मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई-32.
2. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई-32.
3. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर.
2. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
3. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
4. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, उस्मानाबाद.
5. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. उस्मानाबाद.
6. अध्यक्ष, इंडियन मेडिकल असोसिएशन, उस्मानाबाद शाखा.
7. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
8. INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय दंडाधिकारी उमरगा.
9. INCIDENT COMMANDER तथा तालुका दंडाधिकारी, उमरगा.
10. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
11. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद व नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
12. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

13/4/20

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner